29 MAR 2023
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींचा टक्का वाढला

## शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ : स्थापनेनंतर पहिल्यांदाच विद्यार्थिनींनी घेतली आघाडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षान्त समारंभात यंदा ६६,४५७ स्नातक पदवी घेणार आहेत. त्यात ३२,६७२ विद्यार्थी आणि ३३,७८५ विद्यार्थिनी पदवी घेणार आहेत. या दीक्षान्त समारंभाचे वैशिष्ट्य म्हणजे यंदा पदवी घेणाऱ्यांमध्ये विद्यार्थिनींचा टक्का अधिक आहे.

पदवी मिळविण्यात यंदा ताराराणीच्या या लेकींनी बाजी मारली आहे. याशिवाय वेगवेगळ्या अधिविभागात शिकण्याचे प्रमाणही अधिक आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून यंदा प्रथमच हा टक्का वाढला आहे. १९६४ मध्ये १९९ इतकीच पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींचा आकडा असला तरी दर १० वर्षांत तो वाढल्याचे चित्र आहे. १९७४ मध्ये ३,२६८, १९९४ मध्ये ७,८१७, २०१८ मध्ये २६,९३८, २०२२ मध्ये ३२,५२० विद्यार्थिनींनी पदवी मिळविली आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार विद्यापीठाचा ५९वा दीक्षांत समारंभ पुन्हा केंद्रीय पद्धतीने होणार आहे. यापूर्वी त्या-त्या महाविद्यालयात हा दीक्षांत समारंभ होत होता. यासाठी विद्यापीठाकडून महाविद्यालयांना निधी देण्याची तरतूद होती. परंतु केंद्रीय पद्धतीने होणाऱ्या या समारंभामुळे विद्यार्थ्यांना या सोहळ्याचा वातावरणाचा आनंद घेता येणार आहे. दीक्षांत समारंभासाठी नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज फक्त ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात आले. उर्वरित पदवी प्रमाणपत्रे आणि पारितोषिके प्रमाणपत्रे स्नातकांना पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार आहेत. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अधिविभागनिहाय स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.

या समारंभासाठी ड्रेसकोड निश्चित करण्यात आला आहे. यंदा प्रथमच ऑनलाइन पद्धतीने काम झाल्यामुळे पेपरलेस प्रणाली उपयोगात आणली आहे. यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली विद्यापीठानेच विकसित केली आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या ५९व्या दीक्षान्त समारंभाच्या पूर्वसंध्येला मंगळवारी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. (छाया : नसीर अत्तार)

### पदवीप्राप्त विद्यार्थिनी

| | |
|---|---|
| विज्ञान आणि तंत्रज्ञान | १२,६४९ |
| वाणिज्य आणि व्यवस्थापन | ६०,८२५ |
| आंतरविद्याशाखा अभ्यास | १,४१२ |



### महेश बंडगर (राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता)



महेश सोलापूर जिल्ह्यातील सावे (ता. सांगोला) येथील रहिवासी आहे. वडील हयात नाहीत. आई गृहिणी आहे. वडिलांना कुस्तीची आवड होती. त्याचाच वारसा पुढे चालवत त्याने बॉक्सिंग, कुस्ती, ज्युदो अशा खेळात राष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य मिळविले. प्राणिशास्त्र विभागात त्याने अनेक संशोधन प्रकल्प सादर केले आहेत. वन्यप्राण्यांवरील विशेषतः सरिसृप प्रकारातील वन्यजीवांचा विशेष अभ्यास आणि संशोधन करण्याची इच्छा आहे.

### सोहम जगताप (कुलपती सुवर्णपदक विजेता)



सोहम जगताप सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील किल्ले मच्छिंद्रगड येथील रहिवासी आहे. आई गृहिणी आणि वडील शेतकरी आहेत. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतल्यानंतर त्याने एमए मराठी विषयात विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला आहे. सुवर्णपदक मिळताच त्याने आनंद व्यक्त करून मराठीचा प्राध्यापक बनण्याची इच्छा व्यक्त केली. मराठी भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करण्याचा मनोदय त्याने बोलून दाखवला.

> उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण समाधानकारक आहे. चांगल्या शिक्षणाकडे वळलेल्या या ताराराणीच्या लेकींनी आकाशाला गवसणी घालण्याचे काम करावे, हीच अपेक्षा.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे,**
> प्रभारी कुलसचिव,
> शिवाजी विद्यापीठ.

### प्रमुख पाहुणे - संजय धांडे



राष्ट्रपतींच्या हस्ते २०१३ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित आयआयटी कानपूरचे माजी संचालक प्रो. संजय धांडे यांनी (जन्म १४ फेब्रुवारी १९४८) पुण्यातून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. आयआयटी कानपूरमध्ये त्यांनी पीएचडीही घेतली आहे. उत्तम प्रशासक, संशोधक, नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान संशोधक,असलेल्या धांडे यांनी प्रोटोटायपिंग, थ्री डी प्रिंटिंग, रॅपिड टूलिंग या संगणकीय तंत्रज्ञानावर भर दिला आहे. ऑटो प्ले ही नावीन्यपूर्ण कॅड टेक्नॉलॉजी त्यांनी अंतराळ विकास संस्थेसाठी विकसित केली आहे. देशभरातील शासकीय आणि अशासकीय विज्ञान व तंत्रज्ञान संस्थेचे ते संस्थापक संचालक आहेत. सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रोफेसर आहेत.

29 MAR 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# झांज, ढोलपथकाने ग्रंथदिंडीत रंगत

## ग्रंथमहोत्सवास प्रारंभ : वाचनसंस्कृतीच्या जागराने शहर दुमदुमले

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम, झांज, ढोलपथकाने शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथदिंडीत मंगळवारी रंगत आणली. वाचनसंस्कृती वाढविण्याचा संदेश देत तरुणाईने कोल्हापूरच्या मुख्य रस्त्यांवर जागर घातला आणि दोन दिवसीय ग्रंथमहोत्सवाला प्रारंभ झाला.

विद्यापीठाचा ५९वा दीक्षान्त समारंभ आज होणार आहे. मंगळवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, कमला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथदिंडीस कमला महाविद्यालयाच्या व्ही. टी. पाटील भवनापासून प्रारंभ झाला. डॉ. शिर्के यांनी पालखी व ग्रंथपूजन केले. पालखीमध्ये संत



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी दीक्षान्त समारंभाच्या पूर्वसंध्येला प्रथेप्रमाणे ग्रंथदिंडी काढण्यात आली. या दिंडीला कमला कॉलेज येथून प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या सोहळ्यास प्रारंभ झाला. (छाया : नसीर अत्तार)


ज्ञानेश्वरांची प्रतिमा, श्री ज्ञानेश्वरी, भारतीय संविधान, छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, महात्मा फुले व सावित्रीबाई यांचे चरित्र, तसेच राजर्षी शाहू महाराज यांचा स्मारक ग्रंथ होते. ही दिंडी राजारामपुरी, आईचा पुतळा आणि सायबरमार्गे निघून शिवाजी विद्यापीठात आली.

दिंडी मार्गावर विविध प्रबोधनपर फलक घेऊन शहरातील विविध महाविद्यालयांचे ७५०हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले.

29 MAR 2023
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## महेश बंडगर, सोहम जगताप यांचा गौरव



महेश बंडगर



सोहम जगताप

कोल्हापूर : स्थगित झालेला शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ उद्या, बुधवारी होणार आहे. आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे हे प्रमुख पाहुणे असून, अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस आहेत. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

या वर्षी ६६४४७ पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. राष्ट्रपती सुवर्णपदक महेश बंडगर, तर कुलपती सुवर्णपदक सोहम जगताप यांना जाहीर करण्यात आले आहे. १६५९४ विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहून, तर उर्वरित विद्यार्थी पोस्टाने पदवी प्राप्त करणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

यापूर्वी माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या उपस्थितीत दीक्षान्त समारंभ होणार होता. मात्र राज्यपालांनी केलेल्या वादग्रस्त विधानांच्या विरोधात कोल्हापुरात आंदोलन सुरू झाले. त्यामुळे हा कार्यक्रम स्थगित करण्यात आला होता. आता नूतन राज्यपालांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होत आहे.

जनसंपर्क कक्ष
2 9 MAR 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सायंटिफिक इंडेक्स’मध्ये विद्यापीठातील १२ संशोधक

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी ‘ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३’ नुकतीच जाहीर करण्यात आली. या संशोधकांच्या अद्ययावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह एकूण १२ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश आहे.

अमेरिकेतील मिशीगन विद्यापीठामार्फत हा निर्देशांक सन २०२१ पासून दर वर्षी जाहीर करण्यात येत आहे. पहिल्या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी या यादीमध्ये स्थान प्राप्त केले आहे. सन २०२१ मध्ये ४८, सन २०२२ मध्ये ८० आणि आता सन २०२३ मध्ये १२ अशा चढत्या क्रमाने विद्यापीठातील संशोधकांची या यादीमधील संख्या वाढत राहिली आहे. या वर्षीच्या यादीचे वैशिष्ट्य म्हणजे यंदा कला, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे या विद्याशाखांकडील ८ संशोधकांना स्थान प्राप्त झाले आहे.

अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठातील प्रा. मूरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर या दोघांनी संयुक्तपणे ‘आल्पर-डॉजर सायंटिफीक इंडेक्स’ तथा ‘ए.डी. सायंटिफिक इंडेक्स’ विश्लेषित केलेला आहे. त्यासाठी त्यांनी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक तसेच सायटेशन स्कोअर (उद्धरणे) इत्यादी बाबींचे पृथक्करण केले. जगभरातल्या २१,४३९ शैक्षणिक संस्थांमधील १३,४५,१८६ संशोधकांचा डाटा त्यांनी संकलित केला. कृषी व वने, कला व स्थापत्य, वाणिज्य व व्यवस्थापन, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, इतिहास, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, कायदे अभ्यास, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांसह अन्य २५६ उपशाखांमधील संशोधकांचा समावेश या मानांकनामध्ये केला आहे.

त्यातून ‘वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२३’ जाहीर करण्यात आले आहे. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान कायम राखले आहे.

लोकमत

# विद्यापीठात भुयारी मार्गासाठी साडेआठ कोटींचा निधी मंजूर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व आणि पश्चिम भागास जोडण्यासाठी भुयारी मार्ग तयार केला जाणार आहेत. त्यासाठी आठ कोटी ४८ लाख ८१ हजार रुपयांचा निधी अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आला आहे. तसेच या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

जुन्या पुणे-बेंगळुरू महामार्गामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होते. रोज या मार्गावरून दोन ते तीन हजार लोकांची ये-जा सुरू असते. राष्ट्रीय महामार्गावरून शहरात येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे या ठिकाणी भुयारी मार्ग तयार करावा, अशी मागणी होती. अर्थसंकल्पात भुयारी मार्गासाठी साडेआठ कोटींचा निधी मंजूर केल्याची माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठ संघांची आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकनृत्य व लोकवाद्यवृंद संघांची आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. दि. ६ ते ८ एप्रिल रोजी होणाऱ्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा (पंजाब) येथे ही स्पर्धा होणार आहे. या महोत्सवात विद्यापीठाचा २६ सदस्यांचा संघ सहभागी होणार आहे. महोत्सवात सहभागी होणाऱ्या विद्यापीठ संघाचे प्रमुख म्हणून डॉ. टी. पी. शिंदे (मुधोजी महाविद्यालय, फलटण), विद्यार्थी विकास विभागाचे वरिष्ठ सहायक एस. ए. मोरे काम पाहणार आहेत. संघासोबत डॉ. पी. टी. गायकवाड जाणार आहेत. संघास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ बुधवारी (दि. २९) दुपारी १२ वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होत आहे. आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, राज्यपाल रमेश बैस समारंभाचे अध्यक्षस्थान ऑनलाईन पद्धतीने भूषविणार आहेत.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटीलही यावेळी उपस्थित राहणार आहेत. (सविस्तर वृत्त पान ३)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 MAR 2023
पुढारी

# विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास ग्रंथदिंडीने सुरुवात

## वाचन संस्कृतीचा जागर; शालेय विद्यार्थ्यांचाही सहभाग

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शहरातील प्रमुख मार्गावरून ग्रंथदिंडी काढत वाचन संस्कृती वाढविण्याचा संदेश दिला. दोन वर्षांच्या खंडानंतर विद्यापीठाची ग्रंथदिंडी शहरातून निघाली.

विद्यापीठाच्या बुधवारी होणाऱ्या ५९ व्या दीक्षांत समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीचा प्रारंभ डॉ. व्ही. टी. पाटील भवन येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, कमला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. डॉ. शिर्के यांनी पालखी व ग्रंथपूजन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभानिमित्त काढलेल्या ग्रंथदिंडीत सहभागी झालेले कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवर. (छाया : अर्जुन टाकळकर)

पालखीमध्ये संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा, श्री ज्ञानेश्वरी, भारतीय संविधान, छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, महात्मा फुले व सावित्रीबाई यांचे चरित्र व राजर्षी शाहू महाराज यांचे ग्रंथ ठेवले होते.

भारताकडे आलेले जी-२० परिषदेचे नेतृत्व, आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष आणि वाचन संस्कृती यांसह विविध प्रबोधनपर फलक, घोषणा, टाळ-मृदंगाच्या तालावर 'ग्यानबा-तुकाराम'चा जयघोष, लेझीम, झांज पथक ढोलवादन, डोक्यावर पांढऱ्या टोप्या व पारंपरिक वेशभूषा केलेले विद्यार्थी अशा वातावरणात निघालेली दिंडी लक्षवेधी ठरली. दिंडीत शहरातील विविध महाविद्यालयांचे ७५०हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

पुढारी

# विद्यापीठाकडून ६९ नवीन अभ्यासक्रम, विषयांना मान्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात ६९ नवीन अभ्यासक्रम व विषयांना व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता देण्यात आली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या नावाने विद्यापीठातर्फे पारितोषिक देण्यास, फेलोशिपवरील संशोधक विद्यार्थ्यांना गेस्ट हाऊस उपलब्ध करून देण्याबाबत दर ठरविण्यास मान्यता देण्यात आली. नवीन प्राचार्य नियुक्ती व प्राध्यापकांच्या प्रलंबित प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सदस्य प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्राचार्य आर. एस. शेजवळ, डॉ. मेघा गुळवणी, प्रा. आर. डी. ढमकले यांच्यासह राज्यपाल नियुक्त प्रतिनिधी उपस्थित होते.

29 MAR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**शिवाजी विद्यापीठाची मुख्य इमारत झळाळली...** कोल्हापूर : विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाच्या पूर्वसंध्येला मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (फोटो : अर्जुन टाकळकर)

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## राज्यपाल रमेश बैस ऑनलाईन, तर संजय धांडे यांची उपस्थिती; ६६ हजार पदव्यांचे वितरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ केंद्रीय पद्धतीने बुधवारी (दि. २९) दुपारी १२ वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशीय सभागृहात होत आहे. राज्यपाल रमेश बैस समारंभाचे अध्यक्षस्थान ऑनलाईन पद्धतीने भूषविणार आहेत. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे प्रमुख पाहुणे असणार आहेत.

या समारंभास उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रपतीचे सुवर्णपदक महेश बंडगर व कुलपती सुवर्णपदक सोहम जगताप यांना प्रदान केले जाणार आहे. दीक्षांत समारंभानिमित्त विद्यापीठ परिसर चकाचक झाला आहे. रंगरंगोटी केली असून भव्य मंडप घातला आहे. पार्किंगसाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. परीक्षा विभागाच्या वतीने पदव्या देण्यासाठी परीक्षा भवन इमारत येथे ४३ स्टॉल लावले आहेत. यावर्षीच्या दीक्षांत समारंभात ६६ हजार ४५७ पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. यात विद्यार्थिनींची संख्या सर्वाधिक आहे. समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून १६ हजार ५९४ विद्यार्थी तर पोस्टाने ४९ हजार ८६३ विद्यार्थी पदव्या घेणार आहेत. १६ विद्यार्थ्यांना पदवीप्रमाणपत्रे व पारितोषिके व ४६ जणांना पीएच.डी. पदवी प्रदान केली जाणार आहे. पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या ३०० पेक्षा अधिक आहे. व्यासपीठावर ९३ विद्यार्थी व १६० पारितोषिके वितरित केली जाणार आहेत. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पुढारी

# विद्यापीठ 'एनएसए' संचालकपदी डॉ. तानाजी चौगुले

कोल्हापूर : कुरुकली येथील भोगावती महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. तानाजी चौगुले यांची शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या संचालकपदी निवड झाली आहे. कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांनी तीन वर्षाच्या कालावधीसाठी त्यांची नियुक्ती केली आहे.

पुढारी

# 'शिवस्पंदन'मध्ये संगीत, नाट्यशास्त्र अधिविभागाला सर्वसाधारण विजेता

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने प्रथमच आयोजित 'शिवस्पंदन २०२२-२३' विद्यापीठस्तरीय कला, सांस्कृतिक स्पर्धेत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक पटकावला.

विद्यापीठ अधिविभागातील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कलागुणांना संधी मिळण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली होती. ही स्पर्धा सात गटांत झाली. स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा

**सुगम गायन :** प्रतीक्षा पोवार, हर्षदा परीट, धनश्री माने, **सरमूहगीत :** संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, पर्यावरणशास्त्र अधिविभाग; **नकला :** पर्यावरणशास्त्र अधिविभाग, डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी, इतिहास अधिविभाग. **मूकनाट्य :** पर्यावरणशास्त्र अधिविभाग, डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग; **लघुनाटिका :** इतिहास अधिविभाग, डिपार्टमेंट ऑफ नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी, भूगोल अधिविभाग; **लोकवाद्यवादन (एकल) :** संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, डिपार्टमेंट ऑफ फूड सायन्स, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग; **एकल नृत्य :** अंबिका पांढरबळे, गायत्री गोखले, अंकिता डांगे; **समूह नृत्य :** संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, इतिहास अधिविभाग.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ३३० परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत मंगळवारी एमआरएस व एमस्सी या अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले. आजअखेर ३३० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या व्यवस्थितपणे आहेत. मंगळवारी बी.कॉम., बीएस्सी., बीसीए, बीए, एमए., एम.कॉम., बी. फार्मसी, बीबीए, बीई, बॅचलर ऑफ सायन्स आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये, अधिविभागात सुरळीतपणे झाल्या. परीक्षांसाठी १४ हजार ६७६ विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
29 MAR 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५९ व्या दीक्षांत समारंभ बुधवार, दि. २९ रोजी होत आहे. शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे दीक्षांत समारंभाची तयारी पूर्ण झाली आहे. दीक्षांत समारंभाच्या पूर्वसंध्येला विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीला करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : तय्यब अली)

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ बुधवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या समारंभात राज्यपाल रमेश बैस, कानपूर भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे (आयआयटी) माजी संचालक डॉ. संजय धांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे; मात्र राज्यपाल बैस तांत्रिक अडचणीमुळे समारंभास प्रत्यक्ष उपस्थित न राहता ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन करण्याची शक्यता आहे. यंदाच्या दीक्षांत सोहळ्यात राष्ट्रपती सुवर्णपदकाने महेश बंडगर, तर कुलपती सुवर्णपदकाने सोहम जगताप यांना गौरविण्यात येणार आहे. प्रत्यक्ष आणि पोस्टाने ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान केली जाणार आहेत. या दीक्षांत समारंभात १६ हजार ५९४ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष, तर ४९ हजार ८६३ विद्यार्थ्यांना पोस्टाने एकूण ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र दिली जाणार आहेत. पीएच.डी. पदवी ३०० स्नातकांपैकी ४६ स्नातकांना प्रत्यक्ष प्रदान केले जाईल.

2 9 MAR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचन संस्कृती वाढवण्याचा संदेश देत ग्रंथ महोत्सवास प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वाचन संस्कृती वाढविण्याचा संदेश देत तरुणाईने कोल्हापूरच्या रस्त्यांवर जागर घातला आणि दोन वर्षांच्या खंडानंतर शिवाजी विद्यापीठाची ग्रंथ दिंडी शहरात पुन्हा दुमदुमली. ग्रंथ दिंडीने दोन दिवसीय ग्रंथमहोत्सवाला प्रारंभ झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या साथीने शालेय विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग, हे यंदाच्या दिंडीचे वैशिष्ट्य ठरले.



दीक्षांत समारंभानिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या ग्रंथ दिंडीत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी मान्यवर.

विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ दि. २९ रोजी आयोजित होत आहे. दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने दरवर्षी ग्रंथ दिंडी व ग्रंथमहोत्सव आयोजित करण्याची परंपरा विद्यापीठाने जोपासली आहे. सकाळी ७.३० वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, कमला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथ दिंडीस व्ही. टी. पाटील भवनापासून प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी पालखी व ग्रंथ पूजन केले. दिंडी राजारामपुरी, आईचा पुतळा आणि सायबरमार्गे शिवाजी विद्यापीठात प्रविष्ट झाली. त्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहासमोरील जागेत आयोजित ग्रंथमहोत्सवाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले. त्यांच्यासह मान्यवरांनी बॅ. बाळासाहेब खर्डेकर, ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन केले.

या ग्रंथमहोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाचा प्रकाशन विभाग आणि राज्यभरातून आलेल्या १० प्रकाशकांनी एकूण १८ स्टॉलवर विविध विषयांचे हजारो दर्जेदार ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध केले आहेत. कार्यक्रमांना डॉ. अजितसिंह जाधव, अजित चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातर्फे पैंजण डिझाईन स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग, अभिकल्प-इन्स्टिटयूट इनोव्हेशन क्लब आणि हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नावीन्यपूर्ण पैंजण डिझाईन स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेतील सहभागी डिझाईन्सचे तज्ज्ञांच्या पॅनेलकडून मूल्यांकन व गुणांकन करण्यात येणार असून, विजेत्यांना रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. सर्व वयोगटासाठी खुली असलेल्या या स्पर्धेस प्रवेश शुल्क नाही. डिझाईन पाठवण्याची अंतिम तारीख ३१ मार्च असून, अधिक माहितीकरिता शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग येथे स्पर्धा समन्वयक सहायक प्रा. हर्षवर्धन पंडित यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली यांनी केले आहे. यावेळी प्रा. हर्षवर्धन पंडित, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे समन्वयक प्रा. डॉ. अजित कोळेकर, तसेच फाऊंडेशनचे मोहन खोत, संदीप आडसुळे, विलास जाधव, चेतन देशपांडे आदी संचालक उपस्थित होते.

पुण्यनगरी

# ‘शिवस्पंदन’मध्ये ‘संगीत व नाट्यशास्त्र’ विजेता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे प्रथमच आयोजित ‘शिवस्पंदन २०२२-२३’ या विद्यापीठस्तरीय कला, सांस्कृतिक स्पर्धेमध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक पटकावला. या स्पर्धा गटस्तरीय व विद्यापीठस्तरीय अशा दोन स्तरामध्ये समूहनृत्य, लघुनाटिका, मूकनाट्य, भारतीय समूहगीत, लोकवाद्य, नकला, सुगम गायन, एकल नृत्य या आठ कला प्रकारांत घेण्यात आल्या. कार्यक्रमासाठी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. नितीन कांबळे यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एम. बी. पोतदार, डॉ. प्रमोद कसबे, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. पी. एम. माने, डॉ. पी. डी. पाटील, एस. टी. आडके, सुरेश मोरे यांचे सहकार्य लाभले.

पुण्यनगरी

# विद्यापीठ संघांची आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकनृत्य आणि लोकवाद्यवृंद या दोन संघांची आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. बेंगलोर येथे झालेल्या ३६व्या राष्ट्रीय युवा महोत्सवात ही निवड करण्यात आली. दि. ६ ते ८ एप्रिल या कालावधीत लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा (पंजाब) येथे आंतरराष्ट्रीय युवामहोत्सव होत आहे. या निवडीचे पत्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागास मिळाले आहे. हा २६ सदस्यांचा संघ स्पर्धेसाठी ३ एप्रिल रोजी रवाना होणार आहे. या संघाचे प्रमुख म्हणून डॉ. टी. पी. शिंदे (मुधोजी महाविद्यालय, फलटण) आणि एस. ए. मोरे, वरिष्ठ सहायक, विद्यार्थी विकास विभाग हे काम पाहणार आहेत. संघासोबत डॉ. पी. टी. गायकवाड संचालक, विद्यार्थी विकास हे जाणार आहेत. या संघास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ



# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

**कोल्हापूर, ता. २८ :** शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षान्त समारंभ केंद्रीय पद्धतीने उद्या (ता. २९) दुपारी पावणेबारा वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. समारंभास आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. राज्यपाल रमेश बैस अध्यक्षस्थानी असून, ते या समारंभात ऑनलाईन

पान ११ वर >

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

> पान १ वरून

पद्धतीने सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत. सावे (ता. सांगोला) येथील महेश माणिक बंडगर याला 'राष्ट्रपती सुवर्णपदक', तर किल्लेमच्छिंद्रगड (ता. वाळवा) येथील सोहम तुकाराम जगताप याला कुलपती सुवर्णपदकाने सन्मानित केले जाणार आहे. यंदा एकूण ६६ हजार ४५७ स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे. संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'जागर दुर्मिळ वाद्यांचा व भावतरंग' सांस्कृतिक कार्यक्रम दुपारी साडेतीन वाजता आहे. दरम्यान, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आज समारंभाच्या तयारीचा आढावा घेतला. दरम्यान, विद्यापीठाच्या मुख्य इमारत आकर्षक विद्युत रोषणाईने सायंकाळी उजाळून निघाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 MAR 2023

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षान्त समारंभ उद्या, बुधवारी होणार आहे. त्यानिमित्त विद्यापीठाची मुख्य इमारत मंगळवारी आकर्षक विद्युतरोषणाईने उजळून निघाली.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेव

2 9 MAR 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'शिवस्पंदन' सांस्कृतिक स्पर्धा; विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी

# संगीत व नाट्यशास्त्र विभागाला विजेतेपद

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे पहिल्यांदाच 'शिवस्पंदन २०२२-२३' ही विद्यापीठस्तरीय कला, सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक पटकावला.

विद्यापीठ अधिविभागातील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कलागुणांना संधी मिळण्यासाठी शिवस्पंदन स्पर्धा घेण्यात आली. ती गट स्तरीय व विद्यापीठ स्तरीय अशा दोन स्तरामध्ये घेण्यात आल्या. गट स्तरीय स्पर्धा १९ ते २५ मार्च या कालावधीत समूहनृत्य, लघुनाटिका, मूकनाट्य, भारतीय समूहगीत, लोकवाद्य, नकला, सुगम गायन, एकल नृत्य या कला प्रकारांमध्ये घेण्यात आल्या.

या स्पर्धामधून प्रथम व द्वितीय क्रमांक काढून विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी पात्र स्पर्धकांच्या स्पर्धा २७ मार्च रोजी राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशिय सभागृह व वि. स. खांडेकर भाषा भवन या ठिकाणी घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये कला प्रकारनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक काढण्यात आले. सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागास सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक देण्यात आला. 'शिवस्पंदन' संयोजनात विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. नितीन कांबळे यांनी योगदान दिले.




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आयोजित शिवस्पंदन सांस्कृतिक स्पर्धेत बाजी मारलेल्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या संघास सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी शेजारी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड आदी उपस्थित होते.

### विजेते असे

■ या 'शिवस्पंदन'मध्ये प्रतीक्षा पोवार, हर्षदा परीट, धनश्री माने (सुगम गायन), अंबिका पांढरबळे, गायत्री गोखले, अंकिता डांगे (एकल नृत्य), संगीत व नाट्यशास्त्र विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, पर्यावरणशास्त्र विभाग (समूहगीत), पर्यावरणशास्त्र, तंत्रज्ञान, इतिहास विभाग (नकला), पर्यावरणशास्त्र, तंत्रज्ञान, संगीत व नाट्यशास्त्र विभाग (मूकनाट्य), इतिहास, तंत्रज्ञान, भूगोल (लघुनाटिका), संगीत व नाट्यशास्त्र, डिपार्टमेंट ऑफ फूड सायन्स (लोकवाद्यवादन -एकल), संगीत नाट्यशास्त्र, पर्यावरण, इतिहास विभाग (समूह नृत्य) विजेते ठरले.

29 MAR 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठातील चित्र; रोजगाराच्या संधी असल्याने विद्यार्थ्यांचा कल कायम

# दशकात ‘सायन्स’चे अडीच लाख पदवीधर

▸ **संतोष मिठारी :** सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : अन्य विद्याशाखांच्या तुलनेत जागतिक पातळीवर संशोधन, रोजगाराच्या अधिक संधी असल्याने विज्ञान व तंत्रज्ञान (सायन्स) विद्या शाखेतून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेण्याकडे विद्यार्थ्यांचा कल कायम आहे. गेल्या दहा वर्षांत शिवाजी विद्यापीठातून २ लाख ५६ हजार ६०४ विद्यार्थी, विद्यार्थिनींनी ‘सायन्स’चे पदवी घेतली आहे. त्यापाठोपाठ मानव्यविद्या, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचा क्रम आहे.

विद्यापीठाच्या स्थापनेपासून १९६४ ते १९९८ या ३४ वर्षांमध्ये वाणिज्य, सामाजिकशास्त्र, कला या विद्याशाखेतून पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक होते. या विद्याशाखेनंतर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचा क्रम होता. मात्र, सन २००० पासून विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेतील अभ्यासक्रमांना प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वर्षागणिक वाढत गेले. हे प्रमाण अद्याप कायम आहे. यंदा या विद्याशाखेतून पदवी घेणाऱ्या स्नातकांची संख्या २७ हजार ५५० इतकी आहे.

**दीक्षान्त समारंभ पदवी घेणारे विद्याशाखानिहाय विद्यार्थी (हजारात)**

| विद्याशाखा | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० | २०२१ | २०२२ | २०२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | १६९५९ | १८६९३ | २११०८ | २२६४८ | २४५४८ | ३३४५१ | २९२३६ | ३५५९७ | २६८१४ | २७५५० |
| वाणिज्य व व्यवस्थापन | १२०३७ | १२२२९ | ११३१० | १०५५३ | ११२३० | ० | १४६४० | २१९२७ | १९७२० | २११५५ |
| मानव्यविद्या | १७१२३ | १६५७१ | १९८५१ | १६७९७ | १४०२३ | १२०१३ | १४६४५ | १७८८३ | १४०६४ | १५५५३९ |
| आंतरविद्याशाखा | ० | ० | ० | ० | ६८७ | १०४६ | १६४६ | २१५३ | १७६२ | २२१३ |

### ‘नावीन्यपूर्ण, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करू’

■ विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेमध्ये कौशल्यपूर्ण आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांची असलेली अधिक संख्या, अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संशोधन, उच्च शिक्षणाची संधी अधिक असल्याने या विद्याशाखेतून पदवीधर होण्याकडे विद्यार्थ्यांचा अधिक कल आहे. त्याला विद्यापीठाने परदेशातील विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांशी केलेले सामंजस्य कराराचे बळ मिळाले असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सांगितले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील पदवीधरांची संख्याही चांगली आहे. मानव्यविद्याशाखा आणि आंतरविद्याशाखेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.



**अन्य विद्याशाखांमध्येही नव्या संधी**

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत अकरावी ते पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमापर्यंत प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण निश्चितपणे अधिक आहे. मात्र, या वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या, आंतरविद्याशाखा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरही रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत. या संधींचा विद्यार्थी, पालकांनी विचार करणे यापुढील काळात महत्त्वाचे ठरणार असल्याचे डॉ. होमीभाभा राज्य विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन विभागाचे संचालक डॉ. श्रीनिवास कुलकर्णी यांनी सांगितले.

> संशोधन, उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होत असल्याने विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेकडील विद्यार्थ्यांचा कल वाढता आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार कौशल्य विकासावर आधारित नवीन अभ्यासक्रम विद्यापीठ सुरू करणार आहे.
>
> **- सरिता ठकार,** अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान

| १९६४ ते१९९८ दरम्यानचे पदवीधर | |
|---|---|
| वाणिज्य | १०६९४३ |
| सामाजिकशास्त्र | ९८०८० |
| कला | ९३२२३ |
| विज्ञान | ६३२८३ |
| शिक्षणशास्त्र | ४०६८६ |
| अभियांत्रिकी व तंत्रज्ञान | २८६५४ |
| कायदा (लॉ) | ११३०६ |
| वैद्यकशास्त्र | १०१४६ |
| आयुर्वेदिक व होमिओपॅथिक वैद्यकशास्त्र | ३१३० |
| ललितकला | ३२१ |
| शेती व विज्ञान | १०३ |

सकाळ

# विद्यापीठातर्फे पैंजण डिझाईन स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग, अभिकल्प- इन्स्टिट्यूट इनोव्हेशन क्लब आणि हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाउंडेशनतर्फे नावीन्यपूर्ण पैंजण डिझाईन स्पर्धा होणार आहे. स्पर्धा सर्व वयोगटासाठी खुली असून, प्रवेश शुल्क नाही. डिझाईन पाठवण्याची अंतिम ३१ मार्च आहे. शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग येथे प्रा. हर्षवर्धन पंडित यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली यांनी केले.

29 MAR 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दोन वर्षांनी दुमदुमली विद्यापीठाची ग्रंथदिंडी

## वाचन संस्कृतीचा जागर; महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : वाचन संस्कृती वाढविण्याचा संदेश देत तरुणाईने आज जागर घातला आणि दोन वर्षांच्या खंडानंतर शिवाजी विद्यापीठाची ग्रंथदिंडी शहरात पुन्हा दुमदुमली. ग्रंथदिंडीने दोन दिवसीय ग्रंथमहोत्सवाला प्रारंभ झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या साथीने शालेय विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले.

दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडी आज सकाळी साडेसात वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, कमला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कमला महाविद्यालयाच्या व्ही. टी. पाटील स्मृती भवनापासून सुरू झाली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी पालखी आणि ग्रंथपूजन केले. पालखीमध्ये संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा, श्री ज्ञानेश्वरी, भारतीय संविधान, छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, महात्मा फुले व सावित्रीबाई यांचे चरित्र, राजर्षी शाहू महाराज यांचा स्मारक ग्रंथ ठेवला होता. वाचन संस्कृती वृद्धिंगत करणाऱ्या घोषणांसह आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षनिमित्त तृणधान्याचे महत्त्व सांगणाऱ्या घोषणा, टाळ-मृदंगाच्या तालावर 'ग्यानबा-तुकाराम'चा जयघोषात दिंडी पुढे सरकत राहिली. भारताकडे आलेले जी-२० परिषदेचे नेतृत्व, आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष आणि वाचन संस्कृती यांसह विविध प्रबोधनपर फलक घेऊन शहरातील विविध महाविद्यालयांचे सुमारे ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनी दिंडीत मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. दिंडी राजारामपुरी, आईचा पुतळा आणि सायबरमार्गे दिंडी शिवाजी विद्यापीठात आली. शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम, झांज, ढोलवादनाने दिंडीमध्ये चैतन्यदायी वातावरण निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून दिंडी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात विसर्जित झाली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९व्या दीक्षान्त समारंभानिमित्त मंगळवारी शहरातून काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनी प्रबोधनपर फलक घेऊन सहभागी झाल्या.**


### उत्साहाला उधाण

कोरोनामुळे दोन वर्षे दीक्षान्त समारंभ ऑनलाईन झाला. त्यामुळे ग्रंथदिंडी, ग्रंथ महोत्सव झाला नाही. यंदा दीक्षान्त समारंभ ऑफलाईन स्वरुपात होत असल्याने सर्वच घटकांच्या उत्साहाला उधाण आले. त्याची प्रचिती ग्रंथदिंडीमध्ये आली.

सकाळ

# विद्यापीठाच्या 'एनएसएस' संचालकपदी तानाजी चौगुले

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २८ : कुरुकली येथील भोगावती महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. तानाजी महादेव चौगुले यांची शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या (एनएसएस) संचालकपदी निवड झाली आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी तीन वर्षांच्या कालावधीसाठी ही नियुक्ती केली आहे. डॉ. चौगुले यांना अध्यापनाचा २३ वर्षांचा अनुभव आहे. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यातून त्यांची शैक्षणिक व संशोधकीय गुणवत्ता त्यांनी सिद्ध केली आहे. त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

गेली चार वर्षे ते महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कार्यरत आहेत. संघटनात्मक आणि सामाजिक कार्यक्षेत्रातील त्यांचा अनुभव मोठा आहे.

सकाळ

# 'डॉ. जे. एफ. पाटील' यांच्या नावाने पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक आज झाली. त्यात कै. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या नावाने दोन वर्षांतून एकदा पुरस्कार देण्यास मान्यता देण्यात आली.

अर्थशास्त्र परिषद आणि डॉ. पाटील यांच्या कुटुंबीयांनी सुमारे ७ लाख ७७ हजार रुपये देणगी संकलित केली आहे. ती विद्यापीठाकडे सुपूर्द केली जाणार आहे. त्यातून दर दोन वर्षांनी ५५ रुपयांचा पुरस्कार राष्ट्रीय पातळीवर अर्थशास्त्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला देण्याचा प्रस्ताव या कुटुंबीय आणि अर्थशास्त्र परिषदेने विद्यापीठ प्रशासनासमोर मांडला होता. त्याला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. राजाराम महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि लेखक डॉ. बाळकृष्ण यांच्या नावाने विद्यापीठात व्याख्यानमाला सुरू करण्यासही मान्यता देण्यात आली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध संलग्नित महाविद्यालयातील नवीन तुकडी, अभ्यासक्रमाच्या ६९ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. मियावाकी जंगल प्रकल्पांतर्गत सामाजिक वनीकरण विभागाला विद्यापीठात वृक्षलागवड करण्यास मान्यता व्यवस्थापन परिषदेने दिली.


जे. एफ. पाटील

तरुण भारत

# आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये राधिका कळंत्रेला रौप्यपदक

माले : पंजाबमध्ये चंदिगड येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये येथील यशवंतराव चव्हाण




वारणा महाविद्यालयाच्या राधिका कळंत्रेने रौप्यपदक पटकावले. राधिकाची शिवाजी विद्यापीठ संघातून निवड झाली होती. चंदिगड येथील पंजाब विद्यापीठात झालेल्या स्पर्धेत ९० विद्यापीठांतील महिला संघ सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठ महिला संघाने दिल्ली विद्यापीठाला १७–१ पराभूत केले. अंतिम सामना पंजाब विद्यापीठाने १–० ने जिंकला. शिवाजी विद्यापीठ संघाने रौप्यपदक पटकावले राधिकाने राजस्थान, वर्धा, औरंगाबाद येथील राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कास्यपदके पटकावली आहेत. या यशाबद्दल वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांनी अभिनंदन केले. तिला क्रीडा संचालक प्रा. आण्णासो पाटील, क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. ती पन्हाळगड एज्युकेशन अँड स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक अध्यक्ष शिवलिंग कळंत्रे यांची कन्या आहे.

29 MAR 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठात ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन

## शिवाजी विद्यापीठ परिसरात पुस्तकांच्या ५० स्टॉलवर दिवसभर वाचक, विद्यार्थ्यांची गर्दी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभुमीवर मंगळवारी सकाळी आयोजित ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. एम. एस. रंगनाथन व बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

विद्यापीठातील लोककला केंद्रातील 'शिवस्पंदन" या सांस्कृतिक कार्यक्रमांना कुलगुरू डॉ. शिर्के यांनी भेट दिली. ग्रंथमहोत्सवामध्ये भारतीय व परदेशी नामवंत कंपनीचे प्रकाशक, पुस्क विक्रेते, डेटाबेस पॅकिज, डिजीटल ग्रंथ, उपहारगृह आदींचे ५० स्टॉल आहेत.



कोल्हापूर : ग्रंथमहोत्सवाच्या उद्‌घाटनानंतर पुस्तक स्टॉलची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. तुकाराम चौगुले आदी.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पुस्तक व खाद्यपदार्थांच्या स्टॉलची पाहणी केली. ग्रंथमहोत्सवात स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रमाच्या पुस्तक खरेदीसाठी विद्यार्थ्यांनी दिवसभर गर्दी केली होती. सामाजिक, साहित्यिक, वैचारिक पुस्तकांचेही स्टॉल येथे आहेत. महिला बचत गटातर्फे उभारलेल्या उपहाराच्या स्टॉलवर खवैय्यांनी गर्दी केली होती. बुधवारी दीक्षांत समारंभ असल्याने परजिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी मंगळवारीच विद्यापीठ परिसरात हजेरी लावली आहे. दीक्षांत सोहळ्यासाठी उभारलेल्या मंडपामधून विद्यार्थी फिरत होते.

येथील राजमाता जिजाऊ सभागृहातील 'स्पंदन २०२२-२३" या सांस्कृतिक कार्यक्रमातील लोकनृत्य, गीतगायन आणि नाटक दिवसभरात सादर झाली. हे कार्यक्रम पाहण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी हजेरी लावली

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 MAR 2023
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीवर केलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया: रियाज ट्रेनर)